प्रेस नोट दि.१५/०४/२०१९

---

## खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर यांची कामगिरी

## सराईत गुन्हेगाराकडुन लोकसभा निवडणुकाचे पार्श्वभुमीवर अग्नीशस्त्र व जिवंत काडतुसे जप्त

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १४/०४/२०१९ रोजी खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी खडक पोलीस स्टेशन चे हद्दीत आंबेडकर जंयती बंदोबस्तानिमीत्त पेट्रोलींग करीत असतांना कर्मचारी रवि लोखंडे , विनोद जाधव, विशाल जाधव यांना बातमी मिळाली की, खडक पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील गुन्हेगार अजय दादु खुडे हयाचे कंबरेला एक पिस्टल असुन तो धम्मपाल चौक कासेवाडी, भवानी पेठ पुणे येथे थांबला आहे. सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन प्राप्त सुचनांप्रमाणे तपास पथकाचे कर्मचाऱ्यांचे दोन टिम तयार करुन धम्मपाल चौक कासेवाडी, भवानी पेठ पुणे येथे जाउुन सापळा लावला असता, रेकॉर्डवरील गुन्हेगार अजय खुडे हा पोलीसांनी मिळुन आला.

सदर अजय खुडे यास पुर्ण नाव/पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अजय दादु खुडे वय ३० वर्षे रा. खराडी रोड, खराडकर पार्क , लेन नं १, भोलेनाथ मित्र मंडळ, समाधान हॉटेलचे समोर, साईनाथनगर, खराडी पुणे असे सांगितले, त्यास त्याचे कंबरेला काय आहे याबाबत विचारणा केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देवुन लागल्याने त्याची अंगझडती घेता त्याचे कंबरेस मागील बाजुस ३०,०००/- रु किंमतीचे ०१ गावठी पिस्टल व ४००/- रु किं चे ०२ नग जिवंत काडतुस मिळुन आले. सदर चौकशीअंती अजय खुडे याचे विरुध्द खडक पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं.२००/२०१९ आर्म अॅक्ट क. ३ सह २५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.अधिक तपास खडक पोलीस करीत आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर,अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे, श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे, सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, रवी लोखंडे, विशाल जाधव, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, महावीर दावणे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर, इम्रान नदाफ, योगेश जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.